# KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा



संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६८५. वा | शुक्रवार | दि. १६ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# आपल्याच आदेशाची नवे एसडीओ शरद पाटील अंमलबजावणी करणार का?

## तहसीलदार रुपेश खंडारे व मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळेंवर कारवाईची शक्यता वाढली

**जनसंचलन/बुलढाणा**

उपविभागीय अधिकारी म्हणून नव्याने रुजू झालेले व आधी महसूल अधिकारी म्हणून कार्यरत असलेले शरद पाटील हे बुलढाण्याचे तहसीलदार रुपेश खंडारे यांच्या गैरव्यवहारांची चौकशी करून कारवाई करतील का, असा महत्वाचा प्रश्न आता उपस्थित होत आहे. कारण यासंदर्भात एक आदेश शरद पाटील यांनी स्वतः देऊन तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांना चौकशी करण्यास सांगितले होते. आता पाटील हेच खुद्द एसडीओ म्हणून आल्याने आता तत्कालीन तहसीलदार रुपेश खंडारे यांची चौकशी करून कारवाई करणे त्यांना क्रमप्राप्त बनलेले आहे. महसूल विभागात बोकाळलेल्या भ्रष्टाचारावर सातत्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने आसूड ओढल्याने महसूल विभाग हा पुरता उघडा पडला आहे. महसूल विभागात किती खोलवर आणि कशाप्रकारे भ्रष्टाचार बोकाळला आहे, याची इत्थंभूत माहिती सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनने सातत्याने वृत्तमालिकेच्या माध्यमातून प्रकाशित केली होती. दैनिक जनसंचलनच्या वृत्तमालिकेतून महसूल विभागाच्या कारभाराची लक्तरं अक्षरशः वेशीवर टांगल्या गेलेली आहेत. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने अधिकाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम केलेले आहे. स्थानिक वरिष्ठ अधिकारी भ्रष्टाचारी कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करीत नसल्याचे पाहून सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने थेट अमरावती महसूल आयुक्त प्रशासनाचे दार ठोठावण्यात आले. त्यानंतर बुलढाण्याचे महसूल प्रशासन खडबडून जागे झाले व पत्रोपत्री व्यवहार सुरू झाले. एक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याच्या कोर्टात चेंडू टाकून मोकळे होण्याचा प्रयत्न करू लागला. परंतु तरीही अत्यंत निष्ठेने आणि चिकाटीने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने आपले भ्रष्टाचारविरोधी अभियान सातत्याने सुरूच ठेवले. त्यासाठी प्रचंड संयम आणि जिद्द ठेवून काम करावे लागले. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज एकीकडे महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांचा भ्रष्टाचार उघडा-नागडा करीत आहे. त्याच वेळी टेकाळे यांना साथ देणाऱ्यांचाही भंडाफोड करीत आहे. दरम्यान, टेकाळे यांना वाचवण्यासाठी महसूलमध्ये अनेक अधिकारी दिवसरात्र मेहनत घेत होते. त्यातीलच एक बुलढाण्याचे तत्कालीन तहसीलदार रुपेश खंडारे.यांनी टेकाळे यांच्या बेकायदेशीर स्थावर मालमत्तेच्या संदर्भात पदाचा गैरवापर करून एक मोठा गैरव्यवहार केला. टेकाळे यांची जमीन अकृषक करण्याच्या प्रयत्नात त्यांनी अधिकार नसतानाही नियमबाह्य जमीन अकृषकचे काम केले. खंडारे यांना केवळ सनद देण्याचा अधिकार होता, परंतु त्यांनी थेट जमीन अकृषक करण्याचा आदेश काढला. खरे तर रुपेश खंडारे यांना आपण काय करतो आहेत, हे माहिती नव्हते असे अजिबात नाही. कारण एखाद्या तहसीलदाराला आपल्या अधिकारांची जाण नसेल, असे होऊच शकत नाही. त्यामुळे हा गैरव्यवहार शांत डोक्याने झालेला आहे, यात शंका नाही. असा गैरव्यवहार शांत डोक्याने केला गेल्यास तो गुन्हा नक्कीच मानला जायला हवा. जेंव्हा महसूल अधिकाऱ्यांच्या नजरेस ही

**बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांची विभागीय चौकशी सुरू असताना करोडो रुपयांचे नियमबाह्य व्यवहार झाले कसे याची संपूर्ण माहिती पुढील सत्रात**




माहिती आम्ही आणून दिली, तेंव्हा त्यांचेही डोके चक्रावले असणार यात शंका नाही. त्यामुळेच की काय सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या पत्राला उत्तर देताना तत्कालीन महसूल अधिकारी शरद पाटील यांनी बुलढाणा उपविभागीय अधिकाऱ्यांना पत्र पाठवून या प्रकरणी रुपेश खंडारे यांची चौकशी करून अहवाल तात्काळ देण्याचे आदेश दिले. परंतु येथे जे व्हायचे तेच झाले. महसूल विभागात भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याची जी परंपरा आहे, ती येथेही कायम राहिली. तत्कालीन बुलडाणा एसडीओ जाधव यांनी या प्रकरणी कोणतीही कारवाई केली नाही. त्यांनीही टाळाटाळीचे धोरण अवलंबले. काही दिवसांपूर्वी महसूल विभागात बदल्यांचे सत्र चालले. बुलढाण्यात उपविभागीय अधिकारी म्हणून पुलकित सिंह हे रुजू होणार होते. तसे आदेशही निघाले होते. मात्र सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अचानक बुलढाण्यात जोरदार राजकीय वारे वाहू लागले. या वाऱ्यात पुलकित सिंह यांचे नियुक्ती पत्र उडून गेले. पुलकित येथे रुजू होण्यापूर्वीच त्यांची बदली झाली. आता त्यांच्या जागी महसूल अधिकारी शरद पाटील यांची बदली झाली. आता उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांना रुपेश खंडारे आणि महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या कृष्णकृत्यांची पूर्ण माहिती आहे. त्यांनीच महसूल अधिकारी असताना रुपेश खंडारे यांच्या गैरव्यवहारांची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. आता खुद्द पाटील हे उपविभागीय अधिकारी बनल्याने आता ते आपल्याच आदेशाची अंमलबजावणी करणार का? रुपेश खंडारे यांच्यावर कारवाई करणार का? विजय टेकाळे यांच्यावरही कारवाई करणार का? या प्रश्नांची उत्तरे पुढील काही दिवसात मिळतील. जर पाटील यांनी याबाबत तात्काळ कारवाई केली, तर ते कार्यक्षम आहेत हे सिद्ध होईल. त्यांनी स्वतः ला कार्यक्षम सिद्ध करावे, ही आमचीही अपेक्षा आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी तहसीलदार रुपेश खंडारे यांच्यावर आता लवकरात लवकर कारवाई कशी होईल, यासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने पाठपुरावा करणार आहे.


**अजून बरेच काही पुढील भागात...**


# बकऱ्यासाठी शेतात झाडपाला घेत असतांना अचानक विजेचा धक्का लागून मृत्यू

**जनसंचलन/मेरा.बु**

बकऱ्यासाठी शेतात झाडपाला घेत असतांना अचानक विद्युत पोलवरील तुटलेल्या विज ताराला स्पर्श झाला आणि विद्युत शॉक लागून जागीच मृत्यू झाला. ही घटना मेरा खुर्द येथे १४ फेब्रुवारी रोजी सकाळी उघडकीस आली अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मेरा खुर्द येथील अतिशय गरीब व मोल मजुरी करूण कुंटूबाचा उदरनिर्वाह चालविणारे शेख रहीम शेख रजीद वय ५० वर्ष हे मुलाच्या कुंकू टिळयाचा कार्यक्रम चिखली येथे आटोपून सायंकाळी घरी आले आणि बकऱ्याना चारा आणण्यासाठी घागडबडीने गावातील मधुकर वराडे यांच्या गट नंबर ९८ मधील शेतात गेले होते. बराच वेळ होवूनही घरी परतले नाही म्हणून मुलगा व नातेवाईक शोध घेवू लागले शोध घेत असतांना शेख रहीम यांचा मृतदेह विजेच्या तारेखाली आढळून आला. हे पाहून लगेच सरपंच व विज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविले. माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी कनिष्ठ अभियंता पडघान, सरपंच रमेश अवचार, सुनिल गवई, इंतिखाफ महमद हयाद अन्सार शेख, शेख आशिफ, सुधाकर शिंदे यांच्या समोर पंचनामा केला असता शेख रहीम हे मधुकर वराडे यांच्या शेतातून गेलेल्या ३३ केव्हीची मेन लाईनवरील एका विद्युत पोल वरील विज तार तुटलेला असून शेख रहीम यांचा विद्युत शॉक लागून मृत्यू झाला आहे


बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तुरुंगात गेलो तरी लोकसभा निवडणूक लढणारच! शेतकरी नेते रविकांत तुपकरांचा मेळाव्यात निर्धार

## तुपकरांच्या अटकेच्या निर्णयावर १६ फेब्रुवारीला निकाल

**जनसंचलन /बुलडाणा**

न्यायालयाचा आदर राखत निकाल मान्य करणार, जर मला अटक झाली तरी, जेलमधून लोकसभेसाठी अर्ज भरणारच, असा निर्धार रविकांत तुपकरांनी १५ फेब्रुवारी रोजी गर्दे हॉल येथे झालेल्या निर्धार मेळाव्यात बोलून दाखविला. या मेळाव्याला तुपकरांच्या समर्थकांनी गर्दी केली होती. आत असो व बाहेर लोकसभा लढणार ही काळ्या दगडावरची रेष आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी न डगमगता कामाला लागा. लोकं आपल्यासोबत आहेत, मोठ्या प्रमाणात लोकवर्गणी देत आहेत. आपल्याला जनतेतून मिळणारा प्रतिसाद बघून काही नेत्यांची पायाखालची वाळू सरकली आहे, त्यामुळे मला तुरुंगात टाकण्याचा घाट घातला जात आहे, पण मी त्याला घाबरत नाही, मी मैदानात लढणारा कार्यकर्ता आहे, मी माझी लढाई चालूच ठेवणार, असे देखील त्यांनी प्रसंगी ठणकावून सांगितले. तुपकर यांच्या जामिनावर जिल्हा न्यायालयात निकाल येण्याआधी १५ फेब्रुवारीला दुपारी बुलडाणा गर्दे सभागृहात निर्धार मेळावा पार पडला. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याला जिल्ह्याभरातील हजारो तूपकर समर्थकांची मोठी गर्दी गर्दे सभागृहात व सभागृहाबाहेर उसळली होती. यावेळी आपल्या आक्रमक भाषणातून रविकांत तुपकर यांनी लोकसभा लढविण्याचा आपला निर्धार हजारो चाहत्यांच्या आग्रहास्तव व त्यांच्या साक्षीने जाहीर केला. यावेळी टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. आपण मागील २२ वर्षांपासून शेतकरी चळवळीत काम करतो. घरदारावर तुळशीपत्र ठेवून आंदोलन करतोय. शेकडो केसेस दाखल झाल्या, अंगावर पोलिसांच्या लाठ्या खाल्या, तुरुंगात गेलो, घरापासून सहा-सहा महिने दूर राहिलो, तडीपारी भोगले. २२ वर्षांत शेतकरी, शेतमजूर, कामगार, युवकांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. अचानक गोधडीतून उठलो आणि लोकसभा लढणार असे नाही म्हटले, आधी काम केले आणि शेतकरी, तरुण व सर्वसामान्यांच्या आग्रहास्तव आपण लोकसभा लढण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे आता माघार नाही. मी जेलात गेलो तरी, हवालदिल व दुख्खी होऊ नका, टेन्शन घेऊ नका असे ते म्हणाले. विरोधकांची भीती न बाळगता संयम बाळगून झंझावाती प्रचार करा. ही लढाई रविकांत तुपकरांना खासदार करण्याची नसून गावगाड्यातील सर्वसामान्यांच्या अस्तित्वाची लढाई आहे. सोयाबिन-कापसाच्या भावाचे धोरण दिल्लीत ठरते, त्यामुळे लोकसभेत जाणे आवश्यक आहे. म्हणून यंदा कोणत्याही स्थितीत थांबायचे नाही असा निर्धार गावगाड्यातील माणसांनी व शहरातील नागरिकांनी केला आहे. गेल्या दोन निवडणुकात स्वाभिमानीचे नेते राजू शेट्टी यांच्या पक्षादेश मानून थांबलो. पण आता काहीही झालं तरी थांबू नका असा जिल्हावासीयांचा आग्रह आहे. मी सर्वसामान्य माणसांचा आदेश मानणारा कार्यकर्ता आहे. त्यामुळे आता काही झाली तरी बुलडाणा लोकसभा लढण्याचा निर्णय




पक्का झाला आहे. त्यासाठी आता तुम्ही देखील ताकदीने कामाला लागा, असे आवाहन त्यांनी समर्थकांना केले आहे. कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले, जर मी जेल मध्ये गेलो तरी तुम्ही पूर्णपणे निवडणूकीची जबाबदारी उचला, तुम्ही स्वतःच रविकांत तुपकर म्हणून लोकांसमोर जा.. ही निवडणूक माझी नसून तुमच्या सर्वांची आहे, तुमच्या भरोश्यावर आहे, त्यामुळे ताकदीने कामाला लागा. एक वोट एक नोट देण्याचा निर्धार लोकांनी केला आहे, त्यामुळे गावागावात पोहचा, जनतेच्या समर्थनावरच ही निवडणूक आपल्या ताकदीने लढवायची आहे, असे आवाहन तुपकरांनी पदाधिकारी, कार्यकर्ते यांना केले. दरम्यान रविकांत तुपकर यांच्या जामिनावरचा निकाल शुक्रवारी १६ फेब्रुवारीला लागणार आहे. १५ फेब्रुवारीला दुपारी निर्धार मेळावा आटोपून जिल्हा सत्र न्यायालयात तुपकर हजर झाले. यावेळी तुपकरांच्या वतीने वकील त्यांच्या पत्नी अँड.शर्वरी तुपकर यांनी काही कायदेशीर पुरावे दाखल केले, त्यावर युक्तिवाद करण्यासाठी सरकारी पक्षाने वेळ मागितल्याने आता याप्रकरणी शुक्रवारी निकाल येणार आहे.

# लोणार तालुक्यातील पारधी समाजाला शासकीय जमीन उपलब्ध करून द्या मागणीचे तहसीलदारांना निवेदन

**जनसंचलन/ लोणार**

तालुक्यातील पारधी समाजाला उदरनिर्वाह करिता शासकीय जमिनी मिळाव्या या करता दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी बहुसंख्य पारधी समाजाने लोणार तहसीलचे तहसीलदार गिरीष जोशी यांना याबाबत निवेदन दिले निवेदनात नमूद प्रमाणे लोणार तालुक्यातील शारा सावरगाव मुंडे. गंधारी खुरमपूर किन्ही गुंधा आरडव बीबी पारडा दराडे कुंडलस पांग्रा डोळे सुलतानपूर वढव उदनापूर आदीं लोणार तालुक्यातील. या गावांमध्ये पारधी समाजाचे लोक मागील तीस वर्षापासून रहात आहे मात्र रोजी रोटी करिता कोणताही उदरनिर्वाह साठी साधन नसल्यामुळे मोलमजुरी करून जीवन जगावे लागत आहे शासकीय जमिनी उदरनिर्वाह करण्याकरता मिळाव्या जेणेकरून मुला बाळांना शैक्षणिक प्रवाह आणण्याकरता मदत होईल आणि कुटुंब विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल शासनाने आम्हाला शासकीय जमिनी



न दिल्यास आमच्या कुटुंबासहित दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी लोणार तहसील कार्यालयासमोर आम्हाला उपोषणास बसावे लागेल असाही इशारा निवेदनातून दिला आहे यावेळी निवेदन देताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष संदीप मापारी पाटील पारधी समाजाचे नेते शेषराव पवार संजय भोसले सुभाष शिंदे चरका भोसले. अरुण पवार बिहारी चव्हाण चपरासी भोसले बन्सी पवार विठ्ठल पवार अर्जुना भोसले किशन पवार अविनाश पवार विजय पवार तुफान पवार राजेश पवार सह शेकडो पारधी समाजातील महिला व पुरुष उपस्थित होते

# जिल्ह्यातील शेतकरी समस्या व चर्मकार समाज विकासावर मुख्यमंत्र्यांकडून आश्वासन डॉ. गोपाल बच्छीरे

**जनसंचलन/लोणार**

बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी समस्या व चर्मकार समाजाच्या विकासावर शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय प्रवक्ता डॉ. गोपाल बच्छीरे यांच्यासोबत चर्चा करून सदरील समस्या सोडवण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुंबई येथील सह्याद्री शासकीय भवनात झालेल्या विशेष बैठकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. गोपाल बच्छीरे यांना निमंत्रित करण्यात आले होते, सदरील दिडतास चाललेल्या बैठकीत डॉ.बच्छीरे यांनी बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची दैनिय अवस्था बघता संपूर्ण बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून विनाअट शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत त्यांच्या खात्यावर जमा करावी. पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी पीक विमा कंपनीस आदेशित करावे. लोणार सरोवर येथे सिंदखेड राजा येथील जिजाऊ सृष्टीच्या धरतीवर शिवसृष्टी निर्माण करावी जेणेकरून पर्यटक लोणार ला येतील व लोणारचा आर्थिक विकास होईल, यासाठी आम्ही अनेक निवेदन आपणापर्यंत पाठवलेले आहे. त्याचबरोबर २०२० मध्ये चर्मकार समाजाच्या मागासलेपणाचे अध्ययन करण्यासाठी आयुक्त वाय. सी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली चर्मकार आयोग नेमला होता तो आयोग सध्या निष्क्रिय झालेला आहे त्या आयोगावर चर्मकार समाजाचा अभ्यासू व्यक्तीची नियुक्त करून त्याला पुनर्जीवित करावे, जेणेकरून चर्मकार समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक अभ्यास होऊन या समाजाच्या उन्नतीकडे लक्ष वेधले जाईल. केंद्राने सरकारने गुरु रविदास जयंतीची सुट्टी घोषित केलेली आहे परंतु महाराष्ट्र शासनाने सदरील सुटी घोषित केली नाही ती गुरु रविदास जयंती पूर्वी घोषित करण्यात यावी. गुरु रविदासांच्या नावे महाराष्ट्रात विद्यापीठ स्थापन करण्यात यावे. कोरोनाच्या महामारीत चर्मकार समाजाचे अतोनात नुकसान झालेले आहे म्हणून लीडकॉम चे थकीत कर्ज माफ करावे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात रविदास भवन उभारून तेथे वस्तीगृहाची सुविधा व एमपीएससी यूपीएससी चे कोचिंग सेंटर सुरू करण्यात यावे, शालेय पाठ्यक्रमामध्ये गुरु रविदास यांचा धडा पूर्वीप्रमाणे समाविष्ट करावा, अशा अनेक मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा होऊन सचिवांना आदेश देऊन सर्व मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ.गोपाल बच्छीरे यांना दिले

# मुलाला ठार मारण्याची धमकी; खंडणी उकळण्याचा प्रयत्न

**जनसंचलन/ खामगाव**

मुलगा आमच्या ताब्यात आहे. तातडीने एक लाख रुपये न दिल्यास त्याला ठार मारण्याची धमकी देत रक्कम उकळण्याचा प्रयत्न खामगाव येथील सुरेंद्र हरनारायण करनाणी यांच्यासोबत घडला. मात्र, धमकी असल्याने तक्रारीवरून पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. याबाबत करनाणी यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यामध्ये त्यांचा मुलगा चंदन (१९) हा संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय शेगाव येथे शिक्षण घेत आहे. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी सुरेंद्र करनाणी हे दुकानात असताना त्यांच्या मोबाइलवर अज्ञात व्यक्तीने संपर्क साधला. तसेच, मुंबई पोलिस क्राइम ब्रॅचमधून बोलत आहे. तुमच्या मुलाजवळ ड्रग्ज आढळून आले, त्याला तुरुंगात टाकणार अशी धमकी दिली. यावेळी करनाणी यांनी मुलाशी बोलणे करून द्या, असे म्हटले असता अज्ञात व्यक्तीने १ लाख रुपये ऑनलाइन



पाठवा, नाही तर मुलाला मारून टाकतो, अशी धमकी दिली. त्यामुळे करनाणी यांनी खात्री करून घेण्यासाठी मुलगा चंदन याच्या मोबाइलवर संपर्क साधला. त्यावेळी तो शेगाव येथे कॉलेजमध्ये परीक्षा देत होता. प्रकरणी पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अपघातात गंभीर जखमी झालेल्या माकडासह गौ-मातेवर उपचार

**जनसंचलन/ खामगाव**

येथील शेगांव रोड वरखेड फाट्या समोर दिनांक १२ तारखेला एका माकडाला मध्य रात्री पहाटे अज्ञात वाहनाने धडक देऊन गंभीर जखमी केले ते माकड जखमी अवस्थेत रस्त्या लगत राधास्वामी सत्संगच्या बाजूला एका पडीत शेतात घासत घासत तडफडत गेले. घटनेची माहिती दिनांक १३ ला सकाळी ८ वाजता मिळताच एकनिष्ठा फाउंडेशनचे सुरजभैय्या यादव, प्रदीप शमी, गुरमुख गुरबानी हे लगेच पोहचले वनविभाग अधिकारी भास्कर डाबेराव यांना फोन द्वारे माहिती दिली तसेच डॉक्टर कडून उपचार करून घेत वन कर्मचारी सुरेश तायडे, मिलिंद इंगळे स्वाधीन दिले परंतु ते माकड दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजता गतप्राण झाले. दिनांक १३ रोजी सायंकाळी ५ वाजता बर्डेप्लॉट कमानी समोर चौफुल्ली वर एका अज्ञात वाहनाने बेवारस दोन जिवाच्या गौ - मातेला धडक दिली गौ - माता रोडवर रक्तबंबाळ होऊन तडफडत होती कोणी मदत करायला तयार नव्हता मग राम अहीर यांनी घटनेची माहिती एकनिष्ठा गौ - सेवक सुरजभैय्या यादव, सागर बेटवाल यांना देताच त्यांनी आपले सहकारी अभिषेक देशमुख, सौरभ पाटील, गजानन इंगळे, विर यादव, संतोष उकर्डे, मुळीक, घोगरे, जगन कोंडे, दिलीप गावंडे, विशाल यादव यांना सोबत घेऊन गौ - मातेला उचलून बैलगाडी वर टाकून राम अहीर यांच्या घरासमोर नेऊन डॉक्टर निवृत्ती क्षिरसागर यांना बोलावून उपचार केले परंतु गौ - माता दोन जिवाची असल्यामुळे तिच्या समोरच्या पाय पूर्णपणे निकामी झाल्याने तो पाय तुटला व हाडाचे दोन तुकडे झाले आणि पोटावर जबर मार लागल्याने



ती गौ रक्तबंबाळ झाली तिचा बाळ पोटामध्ये मरण पावल्याने गौ - मातेची तब्येत चिंता जनक झाली होती २ तासा नंतर ती गौ मृतमुखी पडली एकनिष्ठा गौ - सेवा फाउंडेशन कडून जेसीबी बोलावून मोठा खड्डा करून रात्री १० वाजता अंतिम संस्कार करून भावपुर्ण श्रद्धांजली देण्यात आली या सेवेसाठी लागणारा खर्च एकनिष्ठा गौ - सेवा फाउंडेशन कडून करण्यात आला अशी माहिती राम अहीर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# असोला बुद्रुक ग्रामपंचायत येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी.

**जनसंचलन/ चिखली**



तालुक्यातील असोला बुद्रुक येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती आज दिनांक १५ २ २०२३ रोजी असोला बुद्रुक येथे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये संत सेवालाल महाराज यांची २८५ जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्रामुख्याने सरपंच प्रतिनिधी संजय रायसिंग चव्हाण उपसरपंच साहेबराव पवार सदस्य कपिल भाऊ चव्हाण अनिल रूपा चव्हाण संदेश राठोड ग्रामसेवक सवडतकर साहेब राजूभाऊ मित्र मंडळ माजी उपसरपंच गजानन चव्हाण व प्रतिष्ठित ग्रामस्थ हजर होते प्रथम संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून जयंती साजरी करण्यात आली सरपंच व उपसरपंच पवार व ग्रामपंचायत सदस्य तसेच असोला बुद्रुक ग्रामपंचायतचे सचिव सवडतकर यांनी मोठ्या थाटामाटात सेवालाल महाराज यांची जयंती साजरी केली असोला बुद्रुक येथील उपसरपंच पवार यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे माहिती ग्रामपंचायत भवन येथे दिली त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की संत सेवालाल महाराज हे एक क्रांतिकारी संत होऊन गेले आहे त्यांनी बंजारा समाज समाजाच न सुधरवता इतर समाजासाठी सुद्धा प्रेरक म्हणून काम केलेले आहे संत सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९रोजी झाला आहे संत सेवालाल महाराज यांनी उत्तम जीवन जगण्याचा सोपा मार्ग बंजारा समाजासाठी तसेच इतर समाजासाठी सुद्धा दिला आहे त्यांच्या मार्गाने जीवन जगत असताना कोणत्याही अडचणी आपल्या जीवनामध्ये येणार नाही असे उदगार असोला बुद्रुक ग्रामपंचायतचे उपसरपंच श्री पवार यांनी ग्रामपंचायत भवन येते काढले आहे बंजारा समाजाला त्यागाची आणि समर्पणाची मोठी परंपरा आहे ग्रामपंचायत सदस्य व सरपंच उपसरपंच व कर्मचारी यांनी संत सेवालाल महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले आहे

# निवडणुकीच्या प्रशिक्षणाने प्रक्रिया सुरळीत होण्यास मदत-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने विविध प्रशिक्षण जिल्हास्तरावरून देण्यात येत आहे. प्रशिक्षणातून प्रामुख्याने कामकाजाबाबत उजळणी करण्यात येत आहे. यात काही महत्वपूर्ण सूचना देण्यात येत आहे. निवडणूक विषयक प्रशिक्षणाने प्रत्यक्ष निवडणूक काळातील प्रक्रिया सुरळीत होण्यास मदत होत असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे फिरते पथक, दक्षता पथक, आदर्श आचार संहिता, व्हीडीओ सर्व्हेलंस टीम, व्हीडीओ व्ह्युव्हींग टीम, माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समिती, निवडणूक खर्च विषयक प्रशिक्षण आज घेण्यात आले. जिल्हा नियोजन सभागृहात हे प्रशिक्षण पार पडले. याऽळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निववडणूक अधिकारी सहासिनी गोणेनवार, उपजिल्हाधिकारी शरद पाटील आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, कोणतीही निवडणूक भयमुक्त आणि योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी विविध समित्यांची नियुक्ती करण्यात येते. या समितीमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मदतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. प्रत्येक निवडणूक प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी प्रशिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे. प्रत्येकाने हे प्रशिक्षण गांभिर्यपूर्वक घ्यावे. प्रशिक्षणामुळे निवडणूक कालावधीतील कामकाजाची माहिती होते. तसेच यासाठी मनुष्यबळ तयार होते. तसेच चोख नियोजन करणे शक्य होते. निवडणूक कालावधीत प्रत्येकाला निवडणुकीच्या अनुषंगाने जबाबदाऱ्या सोपविलेल्या असतात. या जबाबदाऱ्या आचारसंहिता लागू झाल्यापासून सुरू होतात. त्यामुळे सोपविलेल्या कामात हयगय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. माध्यम समितीकडून निवडणूक कालावधीत प्रमाणिकरणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर होते. प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या साहित्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. फिरते पथक आणि दक्षता पथकांनी तपासणी करून रोख रक्कम, दारू, मौल्यवान वस्तू आदींवर लक्ष ठेवावे. निवडणूक विषयक कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी विविध अॅपचा उपयोग या कालावधीत केला जातो. काही अॅपवर नोंदणी आवश्यक असल्यास ती तात्काळ करून घ्यावी. तसेच नागरिकांच्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबतही योग्य ती कार्यवाही करून खुलासा सादर करावा. तालुकास्तरावरही झालेल्या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करावी. यावेळी मुख्य वित्त व लेखा अधिकारी प्रकाश राठोड यांनी खर्च विषयक, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी मिडीया आणि सोशल मिडीया, उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांनी आदर्श आचार संहितेबाबत माहिती दिली.

# दीनदयाल अंत्योदय योजना अंतर्गत राष्ट्रीय नागरिक उपजीविका केंद्राचे उद्घाटन



**जनसंचलन/ लोणार**

दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी लोणार नगरपरिषद लोणार दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियान अंतर्गत उडान शहर स्तर संघ लोणार सोनचिरैया शहर उपजीविका केंद्र लोणार उद्घाटन सोहळा संपन्न लोणार शहरांमध्ये लोणार नगरपरिषद लोणार अंतर्गत सोनचिरैया शहर उपजीविका केंद्राची स्थापना करण्यात आली कार्यक्रमांमध्ये नगरपरिषदच्या जया खिल्लारे नगरपरिषदेचे समूह संघटक घनश्याम भालेराव व मावीम चे समन्वयक देविदास चाटे यांच्या हस्ते सोनचिरैया शहर उपजीविका केंद्राचे उद्घाटन करण्यात आले कार्यक्रमांमध्ये बचत गटातील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या जिज्ञासा महिला बचत गट रिद्धी महिला बचत गट आधार महिला बचत गट स्वयंसहायता बचत गट इतर महिला बचत गट सदस्य उपस्थित होत्या लोणार नगरपरिषद मधील जया खिल्लारे यांनी महिलांना बचत गटाविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली लाटे यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन देविदास चाटे यांनी केले कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सोनाली उंबरकर सविता अंभोरे दिपाली लाटे यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला यावेळी महिला वर्गासाठी हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# मंगळवारी महिला लोकशाही दिन...

**जनसंचलन/बुलडाणा**

महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी घेण्यात येतो. मात्र यावेळी शिवजयंतीनिमित्त सुट्टी असल्यामुळे हा महिला लोकशाही दिन मंगळवार, दि. २० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन प्रत्येक महिण्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार फेब्रुवारी २०२४ मधील तिसरा सोमवार हा दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी शासकीय सुटी असल्यामुळे सदर बैठक दि. २० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात लोकशाही दिनाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे,




असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

# पक्ष, बॅनर नसले तरी माझ्याजवळ जिल्ह्याच्या जनतेच्या विकासाचा विचार - संदीप शेळके

## शेगावात परिवर्तन यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद : संदीप शेळके म्हणाले बिझनेस, करिअरसाठी नाही तर शेतकरी, कष्टकऱ्यासाठी राजकारणात आलो

**जनसंचलन/ शेगाव**

राजकारणात मी बिझनेस किंवा करिअर म्हणून आलेलो नाही. मला माझ्या शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या व्यथा, वेदना दिसतात. माझ्या तरुण भावांच्या रोजगाराच्या समस्या सोडवण्यासाठी मी राजकारणात आलो आहे, असे मत वन बुलडाणा मिशनचे संकल्पक तथा राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष संदीप शेळके यांनी व्यक्त केले. येथील गांधी चौकात १५ फेब्रुवारी रोजी आयोजित सभेला संबोधित करतांना ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आज कापसाला भाव नाही. सोयाबीनला भाव नाही. याबाबत कोणी बोलायला तयार नाही. सहा हजाराच्यावर कापूस घेत नाही. चार हजाराच्यावर सोयाबीन घेत नाही. इकडून तिकडून खेडा खरेदी देऊन टाकली आणि तो व्यापारी जर पळून गेला तर त्याच्यावर स्वतः एखादा लोकप्रतिनिधी बोलायला तयार नाही. आमच्या शेतकऱ्याच्या कष्टाने पिकवलेल्या मालाला भाव नाही. आज कोणाचे खेटर कोणाच्या पायात नाही. नेता जनतेकडे पाहायला तयार नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे. शेतकरी, कष्टकऱ्याला नुकसान भरपाई नाही. कापसावर रोगराई आली त्याची नुकसान भरपाई मिळत नाही. पिकविमा मिळत नाही. आमच्या शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले तर त्याला होल्ड लावून ठेवले. ते पैसे त्याला काढता येत नाही. ज्या लोकांना आपण संसदेमध्ये पाठवले, विधानभवनामध्ये पाठवले ते तोंड उघडायला तयार नाहीत. जर हे सरकार सोयाबीन, कापसाला भाव देऊ शकत नव्हते तर माझ्या बळीराजासाठी एखादे पॅकेज तयार करायला पाहिजे होते. त्याला ती मदत द्यायला पाहिजे होती. बुलडाणा जिल्ह्यात तरुण शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. कारण आमचा शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे . परंतु या लोकांचे याकडे लक्ष नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे. मी राजकारणात येण्यामागचे कारण म्हणजे मी सातत्याने समाजकारणामध्ये काम केले आहे. जिल्ह्यात ४० हजार बचतगटांच्या महिलांचे संघटन बांधले. शेतकऱ्यांना बांधावर खत पोचवण्याचं काम केले. एकाचवेळी तीन हजारांवर बॅग रक्त संकलित केले आहे. पण मला जाणवले की, ही परिस्थिती बदलण्यासाठी कोणीतरी पुढाकार घेतला पाहिजे. काही लोक सत्ता भोगतात आणि स्वतः ला राजा समजायला लागतात. त्यांना एकदा जनतेने ठणकावून सांगितलं पाहिजे जनता सर्वोच्च आहे. तुम्ही आमदार असाल किंवा खासदार असाल तुम्ही सर्वोच्च नाही. प्रजा सर्वोच्च आहे. जे लोक या पद्धतीने काम करतात ते चुकीचं काम करत आहेत. त्यांना त्यांची जागा दाखवण्याची वेळ आलेली आहे. अनेक लोक मला म्हणतात तुमच्याजवळ पक्ष नाही, बॅनर नाही. मी त्यांना ठणकावून सांगतो की, पक्ष नसेल, बॅनर नसेल पण माझ्याजवळ जिल्ह्याच्या जनतेचा विकासाचा विचार आहे. मी ५० ठिकाणी संवाद मिळावे घेतले. परिवर्तन पदयात्रा काढली. बुलढाण्याची जगदंबा माता आणि चिखलीची रेणुका माता यांना पायदळ रॅली काढून साकडे घातले. माते आमच्या शेतकऱ्यांच्या कापसाला, सोयाबीनला भाव मिळाला पाहिजे यासाठी बळ दे अशी याचना केली. जिल्ह्याच्या मागासलेपणाचा कलंक पुसण्यासाठी बळ दे असे साकडे घातले. कारण ही गरज आहे. आता जर लोकप्रतिनिधी विचारत नसतील तर जनतेने ही लढाई स्वतःच्या हातात घेतली पाहिजे, असेही संदीप शेळके म्हणाले. बुलडाणा जिल्हा हा राष्ट्रमाता जिजाऊंचा जिल्हा आहे. संत गजानन महाराजांच्या पदस्पर्शामुळे पावन झाला आहे. जनतेने संधी दिल्यास



येणाऱ्या काळात पैठणच्या धर्तीवर शेगावमध्ये संत विद्यापीठ झाले पाहिजे. संत साहित्याचा प्रचार झाला पाहिजे. संतसंग मिळाला पाहिजे, वारकरी संप्रदायाचे शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी आपण काम करणार आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी एमआयडीसी नाहीत. आमच्या जिल्ह्यातून अनेक बेरोजगार युवकांना आजही मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, चाकण याठिकाणी कामाला जावे लागते. खामगावची एमआयडीसी फार जुनी झाली आहे. तिथे विस्तारित एमआयडीसी झाली नाही, असे संदीप शेळके म्हणाले. राजकारण्यांनी ७६ वर्षांमध्ये केले तरी काय? आजही आपला विकास रस्ते आणि नाल्यांवर अडकलेला आहे. ते काम तर ग्रामपंचायत, नगरपालिका करून घेईल. त्याला आमदार, खासदाराची काय गरज आहे? संसदेत शेतकऱ्याच्या हिताचे धोरण तयार केले पाहिजे. सन्माननिधी काय देता, शेतकऱ्याच्या मालाला भाव दिला तर तोच त्याच्यासाठी खरा सन्मान आहे, असे विचार संदीप शेळके यांनी मांडले.

# शिवसाई क्लासेस बुलढाणाची यशाची परंपरा कायम...



**जनसंचलन/बुलढाणा**


ऑल इंडिया जेईई मेन्स परिक्षेचा निकाल घोषित झाला आहे. या परिक्षेत शिवसाई युनिव्हर्सल ज्यु कॉलजेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश प्राप्त केले. शुभम सरदार ९५.०९, प्रिया काळे ९३.२०, यश पवार ८८.५५, पावन तांगडे ८८.४ परसेंटाईल गुण घेवून यश संपादन केले. ही परिक्षा जानेवारी व एप्रिल अश्या दोन वेळा घेतल्या जाते. आयआयटी, एनआयटीए ट्रीपल आय टी चे स्वप्न पाहणारे देशभरातील १४ ते १६ लाख विद्यार्थी ही परिक्षा देतात. शिवसाई युनिव्हर्सल ज्यु कॉलजेच्या शिवसाई पॅटर्नची ही पाचवी बॅच आहे. प्राध्यापकांचे मार्गदर्शन व प्रत्येक रविवारी होत असलेल्या टेस्ट यामूळे हे यश संपादन करता आल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. शिवसाई युनिव्हर्सल कॉलेज ने NEET, JEE, MHT-CET परीक्षांमध्ये बुलडाणा जिल्ह्यात आपला सर्वोत्कृष्ठ कोचिंगचा दर्जा राखला आहे. आजपर्यंत च्या १०० विध्यार्थ्यांमधून १ विध्यार्थी खरगपूर ५ विद्यार्थी ५ विद्यार्थी करीता झालेली आहे व च्या माध्यमातून १४ विद्यार्थी ४१ विद्यार्थी , करिता प्रवेशित झाले आहेत. संस्थाध्यक्ष डी. एस. लहाने व प्राचर्य सुनील दाभाडकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतूक केले. . या यशामागे विदयार्थी व शिक्षक, पालक आणि संस्था यांची खूप मोठी मेहनत आहे. विद्यार्थ्यांची सकाळी ७ ते दुपारी २ पर्यंत कोचिंग सायंकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत लायब्ररी व प्रत्यक्ष शिक्षक रात्री देखील हजर राहून विद्यार्थ्यांचे शंकांचे निरसन करणे, दररोज टेस्ट घेणे आणि त्यावर चर्चा करणे सातत्याने सुरु असते. शिवसाई युनिव्हर्सल ज्युनिअर कॉलेजच्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवल्याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत केल्यानंतर योग्य मार्गदर्शन मिळाले तर आपल्या शहरात सुद्धा यशाला गवसणी घालता येते हे यातून विद्यार्थांनी दाखवुन दिले असल्याचे डी. एस. लहाने यांनी म्हटले आहे. यशस्वी विदयार्थ्यांना प्रा. जे. व्ही. राव, प्रा. अवनीश पांडे, प्रा. शरद दुबे, प्रा. पुष्पेंद्र राजपूत यांचे मार्गदर्शन लाभले.

# जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी पावसाने लावली दमदार हजेरी...

## रब्बी पिकावर मोठा परिणाम, गहू हरबरा च मोठ नुकसान शेतकऱ्यांची चिंता वाढली...

**जनसंचलन/बुलढाणा**

हवामान अंदाजानुसार आज सायंकाळी बुलढाणा जिल्ह्यात अचानक ढगाळ वातावरण तयार झाले व मेघ गर्जना होत दमदार पावसाने सुरुवात केली.. एक तास जिल्ह्याच्या सर्वच भागात पाऊस कोसळला... त्यामुळे जिल्ह्याच्या मुख्यालयी व तालुक्यातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे या आवकाळी पावसाने रब्बी पिकावर



मोठा परिणाम होणार असून गहू हरबरा पिकाचे मोठे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.. या पावसामुळे शेतकऱ्यामध्ये चिंता वाढली आहे...

# मोबाइलवर मेसेज, पाठलाग करून युवतीचा विनयभंग

**जनसंचलन/ खामगाव**

शहरातील एका वस्तीत राहणाऱ्या एका युवतीच्या मोबाइलवर मेसेज आणि पाठलाग करून विनयभंग करण्यात आला. ही घटना गुरुवारी सकाळी उजेडात आली. पोलिसांनी आरोपी युवकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, शहरातील एका वस्तीतील युवती घरकाम करते. दरम्यान, खामगावजवळील एका गावातील युवक तिचा सतत पाठलाग करतो. तिला मोबाइलवर मेसेज पाठवितो. ही बाब तिने बुधवारी तिच्या घरच्यांना सांगितली

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958